# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्

## को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.



ऑडिट वर्ग - अ

# ४२ वा

## वार्षिक अहवाल

सन २०२३-२०२४

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

## * नूतन संचालक मंडळ *

अध्यक्ष



श्री. प्रकाश संगप्पा वाले
मो. ९४२२०६५५९९

उपाध्यक्ष



श्री. डॉ. अशोक दामोदर सुरवसे
मो. ७३५०५५९९५५

संचालक




श्री. राजगोपाल मु. मिणियार (C.A.)
मो. ९८२२०६६८४३

संचालक



श्री. किसन स. माळी (C.A.)
मो. ९८२२०९८६५३

संचालक



श्री. राजगोपाल रा. झंवर
मो. ९४२२४६०३७४

संचालक



श्री. कल्याणराव व. काळे
मो. ९८२२१९२७९७

संचालक



श्री. अशोक दगडूलाल लुणावत
मो. ९७६३०३६५५५

संचालिका



सौ. संगीता नंदकुमार फाटे
मो. ९८२२९२०७६१

संचालक



श्री. दिपक नारमल मुनोत
मो. ९८२२६०६०८४

संचालक



श्री. शंकर मल्लिकार्जुन पाटील
मो. ९४२२४५९०६२

संचालिका



सौ. अस्मिता सुरेश गायकवाड
मो. ९४२२४६०६३८

बँक प्रतिनिधी संचालक



श्री. दिनकर पुरुषोत्तम देशमुख
मो. ९९२३४०४५००

उपनिबंधक अतिरिक्त (सहकार खाते)



श्री. उमेश उ. पवार
(दि. २३/७/२०२४ पासून)

मुख्य कार्यकारी अधिकारी



सौ. शुभांगी ज्ञा. ढवळे
मो. ८८८८५३७७५१

## ❊ ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❊

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को. ऑप. असोसिएशन लि., सोलापूर या संस्थेच्या सभासद असलेल्या सर्व नागरी सहकारी बँकांची सन २०२३-२०२४ ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३१/०८/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता असोसिएशनच्या कार्यालयात खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

## ❊ सभेपुढील विषयपत्रिका ❊

१) मागील दि. १९/०८/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा मा. संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल, सरकारी ऑडीटेड रिपोर्टसह दि. ३१/०३/२०२४ चे ताळेबंद-पत्रक, सन २०२३-२४ चे उत्पन्न व खर्च पत्रक इ. स्वीकृत करणे.
३) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४) सन २०२४-२५ या सालाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे. २०२३-२४ मधील मंजूर अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन २०२२-२३ च्या लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२३-२४ सालाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७) सन २०२४-२५ या सालाच्या वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

स्थळ : सोलापूर
दि. ०१/०८/२०२४

संचालक मंडळाच्या हुकमावरून
सही/-
**(एस. डी. ढवळे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**❊ विशेष सूचना :**

१) सभासद बँकांनी सदर सभेस मा. चेअरमन किंवा बँकेतर्फे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तींचे नांवचे पत्र दि. २८/०८/२०२४ पूर्वी असोसिएशनकडे पाठवावे.
२) या सभेस आवश्यक असलेली गणसंख्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत न झाल्यास सदरची सभा तहकूब केली जाईल. सदरची तहकूब झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता सुरु होईल आणि वरील विषयपत्रिकेनुसार कामकाज केले जाईल. त्यासाठी गणसंख्येची (कोरम) आवश्यकता राहणार नाही.
३) सन २०२३-२४ सालचा अहवाल, ताळेबंद-पत्रक, उत्पन्न व खर्च-पत्रक व ऑडिट रिपोर्ट तसेच सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक इ. पत्रके असोसिएशनच्या कार्यालयामधील नोटीस बोर्डावर लावलेली आहेत.
४) ज्या सभासद बँकांना ऑडिटेड ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक यासंबंधी काही प्रश्न विचारायचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि. २८/०८/२०२४ पूर्वी असोसिएशनकडे कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी द्यावे. तद्नंतर आलेल्या सूचनांच्या पत्रांचा सदर सभेमध्ये विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी ही विनंती.

## ✲ सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल ✲

**✲ सन्माननीय सभासद नागरी सहकारी बँका**

आपल्या असोसिएशनचा सन २०२३-२४ या सहकारी आर्थिक सालचा वार्षिक अहवाल, ऑडीटेड ताळेबंद-पत्रक, उत्पन्न व खर्चपत्रक, अंदाजपत्रक, इतर पत्रके आपणापुढे मा. संचालक मंडळाच्या वतीने सादर करीत आहे.

**✲ सभासद -**

दि. ३१/०३/२०२४ अखेर असोसिएशनच्या कार्यक्षेत्रातील एकूण नागरी सहकारी बँकापैकी ३३ नागरी सहकारी बँका असोसिएशनच्या सभासद आहेत. अन्य जिल्ह्यातील ११ नागरी सहकारी बँका नाममात्र (सहयोगी) सभासद आहेत.

**✲ वार्षिक वर्गणी -**

असोसिएशनच्या विविध उत्पन्नामध्ये प्रमुख उत्पन्नाचे साधन म्हणजे सभासदाकडील वार्षिक वर्गणी होय. अहवाल वर्षात या सभासदांपैकी सर्व ३३ बँकांकडून तर ११ सहयोगी सभासद बँकांकडून वार्षिक वर्गणी आलेली आहे. अहवाल वर्षात वार्षिक वर्गणीचे दरामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नसून दि. ०१/०४/२०२४ पासून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक वर्गणीचे दर खालीलप्रमाणे वाढ करण्यात आलेले आहेत.

### ✲ वार्षिक वर्गणीचे दर-पत्रक ✲

दि. १/४/२०२४ पासून बदललेले वार्षिक वर्गणीचे दर

| अ.नं. | तपशील | वार्षिक वर्गणी रक्कम रु. | GST 18% | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | खेळते भांडवल रु. ० ते ५० कोटीपर्यंत असल्यास | ७५००/- | १३५०/- | ८८५०/- |
| २. | खेळते भांडवल रु. ५० कोटी ते १०० कोटीपर्यंत असल्यास | १००००/- | १८००/- | ११८००/- |
| ३. | खेळते भांडवल रु. १०० कोटी ते ५०० कोटीपर्यंत वर असल्यास | १५०००/- | २७००/- | १७७००/- |
| ४. | खेळते भांडवल रु. ५०० कोटीच्या वर असल्यास | २००००/- | ३६००/- | २३६००/- |
| ५. | नवीन पुनर्वसनाखाली बँका | १०००/- | १८०/- | ११८०/- |
| ६. | सहयोगी सदस्य बँका | ५०००/- | ९००/- | ५९००/- |

सन २०२३-२४ मध्ये सभासद बँकांकडून एकूण रुपये ४१००००-०० वर्गणी प्राप्त झाली आहे.

**✲ वसुली दाव्याचे कामकाज :**

अहवाल वर्षात सहकार खात्याच्या डॉ. सौ. वैशाली साळवे उपनिबंधक (अतिरिक्त) ह्या वसुली दावा सहकार कायदा कलम १०१ चे कामकाज (दि. ५/७/२०२४ पर्यंत) पहात होते. दि. २३/७/२०२४ पासून सहकार खात्याचे श्री. उमेश उ. पवार उपनिबंधक (अतिरिक्त) कामकाज पहात आहेत व बँकांना वसुलीसाठी योग्य ते वसुली दाखले देत आहेत.

या सालातील दाव्यासंदर्भातील कामकाजाची माहिती पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

**दावे दाखल तपशील** **(रुपये लाखांत)**

| अ.नं. | तपशील | सन २०२१-२०२२ | | सन २०२२-२०२३ | | सन २०२३-२०२४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (दावा प्रकरणे) | संख्या | रक्कम रु. | संख्या | रक्कम रु. | संख्या | रक्कम रु. |
| १. | प्रलंबित प्रकरणे | ९०७ | ८५६८.०१ | १३२१ | १११६३.९४ | ११८१ | ९६९७.४४ |
| २. | दाखल प्रकरणे | २०९१ | २०२७१.८१ | २१२६ | १७२१५.०१ | १६३९ | १२४५४.३९ |
| ३. | एकूण प्रकरणे | २९९८ | २८८३९.८२ | ३४४७ | २८३७८.९५ | २८२० | २२१५१.८३ |
| ४. | वसूली दाखले निकाली प्रकरणे | १६७७ | १७६७५.८८ | २२६६ | १८६८१.५१ | १९३५ | १३६५२.७८ |
| ५. | एकूण शिल्लक प्रलंबित प्रकरणे | १३२१ | १११६३.९४ | ११८१ | ९६९७.४४ | ८८५ | ८४९९.०५ |

सरकारी धोरणामुळे वसुली कक्षाकडील वाढलेला खर्च, कोर्ट फी स्टॅम्प व प्रोसेस फी विचारात घेणे आवश्यक आहे. सर्व सभासद बँकांना विनंती की, त्यांनी अधिनियम १०१ खाली वसुली दाखले घेण्यासाठी जास्तीत जास्त प्रकरणे दाखल करून बँकांनी एन. पी. ए. कर्जाच्या रक्कमेची वसुली करावी.

**✻ प्रशिक्षण :–**

असोसिएशनचा प्रमुख उद्देश नागरी सहकारी बँकांचे संचालक, अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आहे. अहवाल वर्षात खालीलप्रमाणे नागरी सहकारी बँकांतील पदाधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना, क्लार्क व इतर सेवकांना उपयुक्त असे प्रशिक्षण/चर्चासत्र इत्यादी मार्गदर्शक कार्यक्रम आयोजित केले होते. .त्याचा लाभ संबंधितांनी घेतला. प्रशिक्षणास जिल्ह्यातील बँकांनी उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. बँकेचे संचालक, अधिकारी व सेवक वर्गाने डिजीटल कार्यप्रणालीचे प्रशिक्षण घेणे जरुरीचे आहे.

| अ. क्र. | तारीख | प्रशिक्षणामध्ये घेतलेले विषय | कोणासाठी | व्याख्याते | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १) | ३०/४/२०२३ | ✻ कर्जवाटप करताना घ्यावयाची काळजी (priority sector)<br>✻ सहकार कलम १०१, १५६ व १०७ थकबाकी वसुली | कर्जविभाग अधिकारी SRO व क्लार्क इ. | श्री. प्रमोद मेहता (रिटायर्ड जन. मॅनेजर, सारस्वत बँक व CEO व जनसेवा सह. बँक, पुणे)<br>श्री. सुनील हिरेमठ (विशेष वसुली अधिकारी पंढरपूर मर्चंटस् बँक, पंढरपूर) | १२६ |
| २) | २४/६/२०२३ | ✻ वसुलीचे कायदेशीर मार्ग<br>✻ शाखा व्यवस्थापन<br>✻ व्यवसाय वृद्धी | जन. मॅनेजर, ब्रँच मॅनेजर इ. | ॲड. श्री. सागर पाटील (सिनीअर लिगल ऑफिसर, कराड अर्बन बँक)<br>श्री .अमित रेठरेकर (सहाय्यक सरव्यवस्थापक कराड अर्बन बँक)<br>श्री. महावीर साळवी (स्टाफ ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर, कराड अर्बन बँक) | ७८ |
| ३) | २६/८/२०२३ | ✻ सहकार कायदा कलम १०१ अंतर्गत कार्यवाही<br>✻ पुनरिक्षण कर्ज कलम १५४ अंतर्गत कार्यवाही | SRO इ. | मा. श्री. किरण गायकवाड (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर) | ८५ |
| ४) | २७/९/२०२३ | One Stack - mobile Banking | मा. चेअरमन, सीईओ व IT Section Officer | श्री. मनिष गोस्वामी (Head Business development) | ४७ |
| ५) | २८/१०/२०२३ | ✻ स्वयंशिस्त – सकारात्मक दृष्टीकोण<br>✻ वेळेचे व्यवस्थापन, स्वयंप्रेरणा | शिपाई/रेकॉर्ड किपर ड्रायव्हर्स इ. | श्री. धनंजय वडापूरकर (निवृत्त अधिकारी, विदर्भ कोकण ग्रामीण बँक, सोलापूर.)<br>श्री. गिरीश कुलकर्णी (निवृत्त शाखा व्यवस्थापक, विकास सह. बँक) | ७० |
| ६) | १६/११/२०२३ | ✻ नागरी बँकांच्या अडीअडचणी शासन निर्णय २७/१०/२०२३ (श्री. विद्याधर अनास्कर– बँकांसाठी सभा/चर्चासत्र) | मा. चेअरमन, सीईओ | श्री. विद्याधर अनास्कर (राज्य सह. बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष, उपाध्यक्ष नॅशनल फेड. ऑफ स्टेट. को.ऑप. बँक्स लि. नवी दिल्ली) | ५० |
| ७) | २२/११/२०२३ | ✻ नाशिक सहकार परिषदबाबत मिटींग | मा. चेअरमन, संचालक व सीईओ | श्री. विश्वास ठाकूर (अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को.–ऑप. बँक्स असो. मुंबई व नाशिक जिल्हा बँक्स असोसिएशन ) | २० |
| ८) | २३/२/२०२४ ते २५/२/२०२४ | ✻ संचालकांची कार्ये व जबबादारी<br>✻ RBI inspection & compliance<br>✻ कर्जदारांच्या आर्थिक पत्रके व Audit Report | मा. चेअरमन, व्हा. चेअरमन व सीईओ | श्री. विश्वास ठाकूर (अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को.–ऑप. बँक्स असो. मुंबई व नाशिक जिल्हा बँक्स असोसिएशन )<br>CA श्री. दिलीप गुरव (CEO दि कराड अर्बन को.ऑप बँक लि., कराड)<br>CA श्री. गिरीष घैसास (चेअरमन – अहमदनगर जि. ना. बँक्स असो.) | ४६ |

**❋ संचालक मंडळ** : सन २०२२-२०२३ ते २०२७-२०२८ या संचालक मंडळाच्या उर्वरित कालावधीकरिता (सन २०२४-२०२५ ते २०२७-२०२८). सहकारी खात्याचे श्री. आबासाहेब गावडे (अध्यासी अधिकारी) सहा. निबंधक सहकारी संस्था, सोलापूर अधीन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळातून श्री. प्रकाश सं. वाले यांची अध्यक्षपदी व डॉ. श्री. अशोक दा. सुरवसे यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली आहे.

बँक्स् असोसिएशनचे संचालक सी.ए. श्री. राजगोपाल मिणीयार दि महाराष्ट्र स्टेट अर्बन को.ऑप. बँक फेडरेशन लि. मुंबईच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून निवड झालेली आहे. सी.ए. श्री. राजगोपाल मिणीयार यांच्या प्रयत्नामुळे इन्कम टॅक्सची एकूण रक्कम रु. ७,६४,९६०/- असोसिएशनला रिफंड मिळालेले आहेत. असोसिएशनच्या सर्व संचालक मंडळाच्या वतीने संचालक सी.ए. श्री. राजगोपाल मिणीयार यांचे अभिनंदन व आभार मानतो.

**❋ 'बँकिंग प्रगती' – द्वैमासिक** :

आपल्या बँक असोसिएशनमार्फत दि. ७/६/२०१९ पासून दर दोन महिन्याला ''बँकिंग प्रगती'' द्वैमासिक प्रसिद्ध केले जाते. यात आर.बी.आय. व सहकार खाते यांची परिपत्रके, बँकिंग तज्ञांची बँकिंग विषयावर विविध लेख, मते नागरी सहकारी बँकातील कार्यक्रमांना प्रसिद्धी दिली जाते. सध्या या मासिकाचे वैयक्तिक १३२ वार्षिक वर्गणीदार आहेत. मासिकाची मुख्य संपादकाची जबाबदारी बँकिंग तज्ञ – **श्री. राजेंद्र कोठावळे** सांभाळीत आहेत. जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांना विनंती की, त्यांनी आपले सर्व संचालक व कर्मचाऱ्यांना अभ्यास व अद्ययावत माहिती देण्यासाठी बँकिंग प्रगती द्वैमासिकाचे सभासद करावे. मासिकाची वार्षिक वर्गणी रु. २०० आहे.

**❋ बँक्स् असोसिएशनची वेबसाईट** :

सर्व सदस्य बँकांशी त्याचे दावे प्रकरणे संदर्भात व असोसिएशनच्या कार्यासंबंधी माहिती व्हावी या हेतूने बँक्स् असोसिएशनची वेबसाईट दि. ३०/०१/२०१५ रोजी चालू करण्यात आली. यावर स. का. कलम १०१ चे वसुली दाखले, सहकारी खात्याची बँक्स् असोसिएशनची वेबसाईट – www.surbanksassociation.com असे आहे.

**❋ संचालक मंडळ** :

अहवाल वर्षात **श्री. अशोक द. लुणावत** यांनी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण ५ सभा झाल्या. त्यामध्ये विविध विषयावार/तपशीलवार चर्चा होऊन आवश्यक ते निर्णय सर्वानुमते घेण्यात आले. संचालक मंडळातील संचालकांनी मला कामकाजात वेळोवेळी सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**❋ जमाखर्च** :

अहवाल वर्षात असोसिएशनला एकूण रु. ७८,८४,३७८/- इतके उत्पन्न प्राप्त झालेले आहे. त्यामधून एकूण खर्च रु. ३७,०३,२९६/- इतका झालेला असून एकूण रु. ४१,८१,०८२/- इतका निव्वळ नफा झालेला आहे. त्याची नफा वाटणी खालीलप्रमाणे करावी अशी शिफारस मा. संचालक मंडळाने केलेली असून त्यास आपण सर्वांनी मंजूरी द्यावी अशी विनंती आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | वैधानिक राखीव निधी (२५%) | १०,४५,२७० |
| २. | इमारत निधी | ३१,३५,००० |
| ३. | पुढे ओढलेला नफा | ८१२ |
| | | |
| | **एकूण** | **४१,८१,०८२** |

**✲ ग्रंथालय :**

बँक असोसिएशनने सदस्य बँकांच्या संचालकांना, अधिकारी व अन्य सेवकांकरिता ग्रंथालय चालू केले आहे. ग्रंथालयामध्ये बँकेसंबंधी विविध विषयावरील एकूण १४० पुस्तके आहेत. काही बँकेतील सेवक अधिकारी याचा लाभ घेत आहेत. आपण सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे मी आवाहन करतो.

**✲ लेखा परिक्षण वर्ग :**

मागील जनरल मिटींगच्या ठरावाप्रमाणे असोसिएशनचे सन २०२३-२४ सालचे वैधानिक लेखापरिक्षणसाठी चार्टर्ड अकौंटंट श्री. धनराज नोगजा, सोलापूर यांची नेमणूक केली होती. त्यानुसार त्यांनी असोसिएशनचे कामकाजाबाबत, व्यवहाराबाबत ऑडीट करून समाधान व्यक्त केले. त्यांनी त्यांचा अहवाल देऊन योग्य त्यासूचना करून बहुमोल मार्गदर्शन केले आहे. असोसिएशनला ऑडीट 'अ' वर्ग प्रदान केला आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**✲ आभार :**

असोसिएशनचे कामकाजात अहवाल वर्षात वेळोवेळी सर्व सदस्य, सहयोगी सदस्य, तत्कालीन सहकार आयुक्त व निबंधक मा. श्री. अनिल कवडे, मा.श्री. शैलेश कोतमीरे व सध्याचे श्री. दिपक तावरे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे, मा.श्री. योगीराज सुर्वे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, मा. श्री. किरण गायकवाड, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर, मा. श्री. व्ही.व्ही. डोके, विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सोलापूर यांनी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. तसेच महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन मुंबईचे अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा, महाराष्ट्र राज्य असोसिएशनचे व नाशिक जिल्हा नागरी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर, तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन, पुणे चे अध्यक्ष अॅड. श्री. सुभाष मोहिते व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् असोसिशन, अहमदनगर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे चेअरमन श्री. गिरीष घैसास, सातारा जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन, सांगली जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन यांनी वेळोवेळी आम्हांस केलेल्या सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल आभारी आहे.

सदरचा अहवाल, त्यातील विषयांना, ऑडीटेड वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, अंदाजपत्रक अन्य नमूद बाबींना आपण मंजूरी द्यावी, ही विनंती.

धन्यवाद !

जय सहकार, जय महाराष्ट्र !!

आपला विश्वासू,
सही - ×××
**(श्री. प्रकाश सं. वाले)**
अध्यक्ष

## ❊ नोकरभरती एजन्सी म्हणून मान्यता ❊

दि. १४/०६/२०२२ रोजीच्या सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचा कार्यालयीन आदेश जा.क्र.ना बँका १ –सआं/ना. सह. बँक्स् कर्म भरती पॅनेल/२०२२/१३८८ नुसार सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनच्या नागरी सहकारी बँकेच्या नोकरभरतीच्या एजन्सी पॅनेलमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. व दि. २३/७/२०२४ रोजीच्या मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयीन आदेशानुसार, नोकरभरती एजन्सी मुदतवाढ मिळालेले आहे.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनला दिलेल्या नोकरभरती एजन्सी म्हणून मान्यता व नोकरभरती एजन्सी मुदतवाढ दिल्याबद्दल व सहकार्याबद्दल सर्व संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

**तरी नागरी सहकारी बंकांनी आपल्या बँकेचे नव्याने पदभरती करावयाची असल्यास सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनमार्फत करावे ही विनंती.**

**सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनमार्फत मागील आर्थिक वर्षात खालील नागरी सहकारी बँकांचे ऑनलाईन व ऑफलाईन नोकरभरती प्रक्रिया करण्यात आलेले आहे.**

| अ.नं. | बँकेचे नाव | तपशील | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १. | दि कराड अर्बन को–ऑप. बँक लि., कराड | ऑनलाईन | २०९ |
| २. | दि म्युनिसिपल को–ऑप. बँक लि., मुंबई | ऑनलाईन | १३ |
| ३. | सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई | ऑनलाईन | ५१ |
| ४. | दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सह. बँक, अमरावती | ऑनलाईन | ४३ |
| ५. | दि पंढरपूर मर्चन्टस् को–ऑप. बँक लि., पंढरपूर | ऑफलाईन | १५ |
| ६. | दि कमर्शिल को.ऑप. बँक लि., कोल्हापूर | ऑफलाईन | १९ |

CA Dhanraj H. Nogaja

Dhanraj Nogaja & Associates
CHARTERED ACCOUNTANTS

## ✻ वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल ✻

सन २०२३-२४

प्रति,
मा. सभासद,
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑप. असोसिएशन लिमिटेड,
सोलापूर.

**✻ आर्थिक विवरण पत्रकांवरील वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल :**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को. ऑप. असोसिएशन लिमिटेड, सोलापूर या संस्थेचे दि. ०१-०४-२०२३ ते दि. ३१-०३-२०२४ या कालावधीचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये दि. ३१ मार्च २०२४ रोजीच्या आर्थिक पत्रकांचे म्हणजेच दि. ३१ मार्च २०२४ रोजीच्या ताळेबंदाचे, त्यासोबत जोडलेल्या त्या दिवशी संपणाऱ्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकाचे, त्यासोबत जोडलेल्या हिशोबांच्या धोरणांचा पूर्णपणे सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती इ. चा समावेश आहे.

**✻ व्यवस्थापनाची आर्थिक विवरण पत्रकांबाबतची जबाबदारी :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या खाली बनविलेले नियम या अन्वये सत्य व वाजवी परिस्थिती दर्शविणारी आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी ही संस्थेच्या व्यवस्थापन समितीची आहे. त्यामध्ये सत्य व रास्त परिस्थिती दर्शविणारी आर्थिक पत्रके तयार करण्याकरिता आवश्यक असणरी अंतर्गत नियंत्रण पद्धती तयार करणे, त्याची अंमलबजावणी करणे व राबविणे जेणेकरून तयार होणारी आर्थिक पत्रके सत्य व रास्त परिस्थिती दर्शवू शकतील आणि अशी आर्थिक पत्रके ही अपहार अथवा दप्तरी चुकामुळे तयार झालेली चुकीची आर्थिक पत्रके न बनू देणे याचा समावेश आहे.

**✻ लेखापरिक्षकाची जबाबदारी**

आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाचे आधारे सदर आर्थिक पत्रकांबाबतचे मत व्यक्त करण्याची आमची जबाबदारी आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस् ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाद्वारे निर्देशित केलेल्या मापदंडानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण केलेले आहे. त्या मापदंडानुसार लेखापरिक्षणाचे नियोजन व कार्य असे असावे ज्या जोगे या आर्थिक पत्रके अपहार अथवा दप्तरी चुकामुळे होणाऱ्या लक्षणीय चुकांपासून मुक्त राहतील याची सर्वसाधारणपणे खात्री होईल.

आर्थिक विवरण पत्रकामध्ये दाखवलेल्या रकमा व केलेली विधाने याबाबतचे योग्य पुरावे मिळविणे यांचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये असतो. तसेच अपहार अथवा दप्तरी चुकांमुळे होणारी आर्थिक विवरण पत्रकामधील कोणतीही लक्षणीय अनियमितता व त्यामुळे निर्माण होणारी जोखीम यांचे मूल्यमापन करून त्याबाबत अंदाज घेऊन स्वतःची कार्यपद्धती निवड करावयाची असते. सदर जोखमीची पडताळणी करताना लेखापरिक्षकांनी संस्थेच्या आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याच्या व सादर करण्याच्या अंतर्गत नियंत्रणाबाबत विचार करून लेखापरिक्षण कार्याची त्या त्या परिस्थितीनुसार कार्यपद्धती ठरविली पाहिजे. सदर आर्थिक पत्रके बनविण्याकरिता व्यवस्थापनाने हिशोबाची जी धोरणे अंमलात आणली आहेत व जे अंदाज केले आहेत, ती पडताळणे व त्याबाबत योग्य निष्कर्ष काढणे तसेच आर्थिक विवरण पत्रकांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन सर्वसाधारणपणे करणे याचा देखील समावेश लेखापरिक्षणामध्ये होतो.

लेखापरिक्षणाचे मत ठरविण्याकरिता पुरेसा व योग्य तो पुरावा आम्हास उपलब्ध झाला आहे, असा आमचा विश्वास आहे.

**❋ लेखापरिक्षकाचे मत –**

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे आम्हास उपलब्ध झाले आहेत आणि ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हांस देण्यात आलेल्या खुलाशावरून ही आर्थिक विवरण पत्रके महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व अन्य लागू कायदे तसेच निबंधकांनी वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकान्वये अपेक्षित अशारितीने आवश्यक ती अशी सर्व माहिती देतात आणि भारतात सर्वमान्य असणाऱ्या जमा खर्चाच्या तत्त्वाप्रमाणे संस्थेची सत्य व रास्त परिस्थिती दर्शवित आहेत.

३. अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१ मार्च २०२४ रोजीच्या संस्थेच्या रास्त परिस्थितीची

ब) नफा तोटा पत्रकाच्या बाबतीत दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या नफ्याची–तोट्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग 'अ' 'ब' व 'क' मधील केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

**❋ इतर कायदेशीर व नियमक बाबतीतील अहवाल**

१. आमच्या लेखापरिक्षण कार्यास आवश्यक असणारी विवरणपत्रके संस्थेने सादर केली असून ती योग्य व परिपूर्ण आहेत.

२. लेखापरिक्षण अहवालासोबत जोडलेला संस्थेचा ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहे.

३. आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल त्याप्रमाणे आम्ही तपासलेले संस्थेचे सर्व व्यवहार संस्थेने अधिकाराच्या मर्यादेतच केलेले आहेत.

४. आमच्या मते सोबत जोडलेला ताळेबंद व नफा–तोटा पत्रक लागू असणाऱ्या लेखांकन मानकाप्रमाणे तयार करणेत आला आहे.

५. सहकारी वर्ष सन २०२३–२०२४ करिता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** प्रदान करण्यात आलेला आहे.

दिनांक : २७–०६–२०२४
स्थळ : सोलापूर.

धनराज नोगजा ॲण्ड असोसिएटस्
(चार्टर्ड अकौंटंट)

सही×××

**सनदी लेखापाल धनराज नोगजा**
मे. नं. ११२१६३
फर्म नोंदणी नं. एफ.आर.एन. १२२६१७W
ऑडीट पॅनल नं. १०३९५
UDIN : 24112163BTZXXQ5116

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया (ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर.

**उत्पन्न व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४**

| ३१/०३/२०२३ रुपये | खर्च बाबी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये |
|---|---|---|---|
| | **संचालक मिटींग व प्रवास भत्ते खर्च** | | ५२६५८ |
| १०६९८ | संचालक मंडळ/सेवक प्रवास खर्च | २५३२५ | |
| १९४५० | संचालक मंडळ भत्ता खर्च | १८७२० | |
| २५९४ | संचालक मंडळ मिटिंग खर्च | ८६१३ | |
| | **सेवक वेतन, सानुग्रह, उपनिबंधक वेतन खर्च** | | १५२६५८६ |
| ७८६९१५ | सेवक वेतन खर्च | ९४९२०० | |
| ३४६६०० | उपनिबंधक (अतिरिक्त) वेतन खर्च | ३१३५०० | |
| ३५८८० | सेवक रजावेतन अंशदान खर्च | ४०७७० | |
| १२४६४० | सेवक सानुग्रह अनुदान खर्च | २२३११६ | |
| | **भाडे, कर, विमा, वीज, खर्च इ.** | | १२०५०८ |
| ९३०८० | म्युनिसिपल टॅक्सेस खर्च | ८८१०६ | |
| १७९६ | विमा प्रिमियम खर्च | १५२२ | |
| ३१९१० | लाईटबिल खर्च | ३०८८० | |
| | **टपाल, दूरध्वनी वेबसाईट खर्च** | | ३४६७३ |
| ६००० | वेबसाईट खर्च | ६५०० | |
| २०६९६ | टपाल, तार, दूरध्वनी खर्च | २८१७३ | |
| ११८०० | **लेखापरिक्षण फीज खर्च** | | १०००० |
| ७०८० | **इन्कम टॅक्स रिटर्न चार्जेस खर्च** | | ३५४० |
| ७२२६३३ | **इन्कम टॅक्स खर्च** | | ० |
| ७२९८ | **इन्कम टॅक्स व्याज खर्च** | | ३७० |
| | **झीज व दुरूस्ती खर्च** | | ६५६७५ |
| ६९९९ | १. दुरूस्ती | ६०६७५ | |
| ५७८२५ | २. झीज | ५००० | |
| | **छपाई व स्टेशनरी, जाहीरात खर्च** | | ७५६०७ |
| ४६३४८ | स्टेशनरी व छपाई खर्च | ७२८३४ | |
| ० | जाहीरात खर्च | २७७३ | |
| | **सादीलवार, बँक चार्जेस, लॉकर रेंट इ.** | | १२५५४४ |
| ७८५ | बँक कमिशन खर्च | १५४७३ | |
| ६१६११ | सादीलवार खर्च | १०६८८५ | |
| ३१८६ | लॉकर रेंट खर्च | ३१८६ | |
| ० | **जी.एस.टी. टी.डी.एस. इ.** | | २४०६० |
| ० | जी.एस.टी. रिटर्न फीज खर्च | १५३४० | |
| पुढील पानावर | एकूण पुढील पानावर | | पुढील पानावर |

| ३१/०३/२०२३ रुपये | उत्पन्न बाबी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये |
|---|---|---|---|
| ४१८५०० | वार्षिक वर्गणी जमा खाते | | ४१०००० |
| ३२७६७७० | प्रोसेस फी जमा खाते | | २३२५८१० |
| ६४८०० | प्रशिक्षण फी जमा खाते | | ५८१४०० |
| १००६५ | बँक व्याज जमा (सेव्हिंगवरील) | | १३११४ |
| ० | इन्कम टॅक्स व्याज जमा | | २२१६६ |
| ० | इन्कम टॅक्स परतावा जमा (२०२३-२०२४) | | ७२२३६० |
| ० | स्क्रॅप विक्री जमा | | ३००० |
| ० | नोकर भरती फीज जमा | | २३६६००८ |
| | **गुंतवणुकीवर मिळालेले व्याज जमा खाते** | | १२३६००० |
| ४६८०५४ | गुंतवणुकीवर मिळालेले व्याज | ५१४६०८ | |
| ५१३८९७ | गुंतवणुकीवरील येणे व्याज | ७२१३९२ | |
| | **किरकोळ जमा खाते** | | |
| २१२८०० | किरकोळ जमा | | १६३८०० |
| २६६०० | बँकिंग प्रगती वार्षिक वर्गणी जमा खाते | | २६४०० |
| ४२११ | छपाई व स्टेशनरी (नक्कल फी) | | १४३२० |
| पुढील पानावर | एकूण पुढील पानावर | | पुढील पानावर |

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को–ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया (ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर.

## उत्पन्न व खर्च पत्रक दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४

| ३१/०३/२०२३ रुपये | खर्च बाबी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये | ३१/०३/२०२३ रुपये | उत्पन्न बाबी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | टी.डी.एस. खर्च | ४७२० | | | | | |
| ० | टी.डी.एस. रजिस्ट्रेशन **चार्जेस** खर्च | ४००० | | | | | |
| ० | नोकर भरती खर्च | | ९८२३८९ | | | | |
| १३०६०८ | प्रशिक्षण फी खर्च | | ६२८०९१ | | | | |
| ० | निवडणूक खर्च | | ५०५९५ | | | | |
| ३५४० | राज्य फेडरेशन वार्षिक वर्गणी खर्च | | ३००० | | | | |
| २४५५७२५ | **वाढावा/निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग** | | ४१८१०८२ | | | | |
| ४९९५६९७ | **एकूण** | | ७८८४३७८ | ४९९५६९७ | | | ७८८४३७८ |

**सही×××**
**सौ. शुभांगी ज्ञा. ढवळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सही×××**
**डॉ. श्री. अशोक दा. सुरवसे**
संचालक

**सही×××**
**श्री. प्रकाश सं. वाले**
संचालक

**सही×××**
**श्री. अशोक द. लुणावत**
अध्यक्ष

As per my report of even date
**सही×××**
धनराज नोगजा अँन्ड असोसिएटस्
(चार्टर्ड अकौंटंट)
मे. नं. ११२११६३
फर्म नोंदणी नं. एफ.आर.एन. १२२६१७W
ऑडीट पॅनल नं. १०३९५
UDIN : 24112163BTZXXQ5116

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया (ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर.

## ताळेबंद पत्रक अॅज ऑन दि. ३१/०३/२०२४ अखेर

| ३१/०३/२०२३ रुपये | भांडवल व देणी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये |
|---|---|---|---|
| | **राखीव निधी व इतर निधी** | | २४२१६२५५ |
| ८९३५८०० | वैधानिक राखीव निधी | ९५८९७५५ | |
| १२६१७००० | इमारत निधी | १४४५७००० | |
| १२५००० | कॉटीजन्सी निधी | १२५००० | |
| ४४५०० | सेवक कल्याण निधी | ४४५०० | |
| | **इतर देणी** | | १०९७५४० |
| ३९६३ | लायबिलीटीज फॉर एक्सपेन्सेस देणे | ४०२२ | |
| ११८०० | ऑडीट फीज देणे | ११८०० | |
| ८८७६० | सेवक सानुग्रह अनुदान देणे | २२३११६ | |
| ३६५०० | उपनिबंधक मानधन व भत्ता देणे | २७३०० | |
| ३५४० | इन्कम टॅक्स रिटर्न चार्जेस देणे खाते | ३५४० | |
| ० | जी.एस.टी. रिटर्न फीज देणे खाते | १५३४० | |
| ० | जाहीरात चार्जेस देणे खाते | ८२१०२ | |
| ० | नोकर भरती अॅडव्हान्स रक्कम देणे खाते | ४८०००० | |
| ० | टी.डी.एस. रक्कम देणे खाते | १८६०१ | |
| ० | टी.डी.एस. रजिस्ट्रेशन फीज देणे खाते | ४७२० | |
| २१५००० | इन्कम टॅक्स देणे खाते | ० | |
| ० | अनामत देणे खाते | ७५०० | |
| ० | जी.एस.टी. रक्कम देणे | २१९४९९ | |
| | **संचित नफा** | | ४२०१९९३ |
| २०१८६ | १. मागील वाढावा | २०९११ | |
| २४५५७२५ | २. चालू सालचा नफा वाढावा | ४१८१०८२ | |
| २४५५७७७४ | एकूण | | २९५१५७७८ |

| ३१/०३/२०२३ रुपये | जिंदगी व येणी | रुपये | ३१/०३/२०२४ रुपये |
|---|---|---|---|
| | **हातातील व बँकातील रोख शिल्लक** | | |
| ६२ | **रोख शिल्लक** | | १९६८ |
| | **बँकातील शिल्लक (सेव्हिंग खाते)** | | १२०१८८ |
| ४७३५ | सोलापूर जि.म. सहकारी बँक लि._(A/c 110103170000016) | ४७६० | |
| ३८२९२ | सोलापूर जनता सहकारी बँक. लि. (A/c 5870012000019865) | २८४७२ | |
| ६०३४५ | ब्रह्मदेवदादा माने सह. बँक लि. (A/c 104030000001270) | ९११८ | |
| ० | एच.डी.एफ.सी. बँक लि. (A/c 50200086054540) | ७७८३८ | |
| | **गुंतवणूक** | | २१२३११३६ |
| ५२६२८२ | सोलापूर जि.म.सह. बँक लि. (NRFD) | ५६५२३७ | |
| १६०९३६१२ | नागरी सहकारी बँकांमधील मुदतठेवी | २०६६५८९९ | |
| ५१३८९७ | **इंटरेस्ट अॅक्रुड बट नॉट रिसीव्हड** | | ७२१३९२ |
| | **इमारत (झीज वजा जाता)** | | ६९९८०९१ |
| २२८१४५ | जुनी इमारत झीज वजा जाता | २०५३३० | |
| ६५३०११८ | खुली जागा खाते | ६५३०११८ | |
| २०१९४३ | खुली जागा विकास खाते | २०१९४३ | |
| ५५००० | नविन इमारत डेव्हलपमेंट खाते | ६०७०० | |
| | **डेडस्टॉक, फर्निचर, फिक्चर्स इ.** | | २७४५३८ |
| १९२१७० | डेडस्टॉक (झीज वजा जाता) | १८११३३ | |
| १३९४२ | कॉम्प्युटर मशीनरी (झीज वजा जाता) | ३६६३६ | |
| २८४९५ | फर्निचर, फिक्चर्स, फिटिंग्ज (झीज वजा जाता) | ३९४२० | |
| १८८०२ | लायब्ररी खाते (झीज वजा जाता) | १७३४९ | |
| | **इतर येणी** | | १६८४७५ |
| २५०० | टेलीफोन डिपॉझीट येणे | २५०० | |
| ४००० | एमएसईबी डिपॉझीट येणे | ४००० | |
| २५००० | निवडणूक अॅडव्हान्स येणे | ० | |
| २०४३४ | टी.डी.एस. येणे | ६५१६ | |
| ० | नोकर भरती जाहीरात चार्जेस येणे | ८०४५९ | |
| ० | नोकर भरती डिपॉझीट येणे | ७५००० | |
| २४५५७७७४ | एकूण | | २९५१५७७८ |

As per my report of even date

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **सही×××** | **सही×××** | **सही×××** | **सही×××** | **सही×××** |
| **सौ. शुभांगी ज्ञा. ढवळे** | **डॉ. श्री. अशोक दा. सुरवसे** | **श्री. प्रकाश सं. वाले** | **श्री. अशोक द. लुणावत** | धनराज नोगजा अॅन्ड असोसिएटस् |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | संचालक | संचालक | अध्यक्ष | (चार्टर्ड अकौंटंट) |

मे. नं. ११२१६३
फर्म नोंदणी नं. एफ.आर.एन. १२२६१७W
ऑडीट पॅनल नं. १०३९५
UDIN : 24112163BTZXXQ5116

# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया (ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर.

**सन २०२४-२५ चे उत्पन्न खर्चाचे अंदाज पत्रक**

**रुपये लाखांत**

| अ.नं. | तपशील | अंदाजे खर्च २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | फरक खर्च २०२३-२४ | अंदाजे खर्च २०२४-२५ | तपशील | अंदाजे उत्पन्न २०२३-२४ | प्रत्यक्ष उत्पन्न २०२३-२४ | फरक उत्पन्न २०२३-२४ | अंदाजे उत्पन्न २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संचालक मिटींग व प्रवास भत्ते | ०.७० | ०.५३ | -०.१७ | ०.७० | वार्षिक वर्गणी | ४.५० | ४.१० | -०.४० | ४.५० |
| २ | सेवक वेतन, सानुग्रह, उपनिबंधक वेतन | १५.०० | १५.२६ | +०.२६ | १८.०० | प्रोसेस फीज | ३५.०० | २३.२५ | -११.७५ | ३५.०० |
| ३ | भाडे, कर, विमा, वीज | १.५० | १.२० | -०.३० | १.५० | गुंतवणुकीवरील व्याज | ११.०० | १२.३६ | +१.३६ | १३.०० |
| ४ | टपाल, दूरध्वनी, वेबसाईट | ०.५० | ०.३४ | -०.१६ | ०.५० | प्रशिक्षण जमा खाते | १.०० | ५.८१ | +४.८१ | ७.०० |
| ५ | लेखापरिक्षण फीज | ०.२० | ०.१० | -०.१० | ०.२० | किरकोळ जमा | ३.०० | २.१७ | -०.८३ | ३.०० |
| ६ | झीज व दुरुस्ती | १.०० | ०.६५ | -०.३५ | १.०० | इन्कम टॅक्स परतावा जमा | - | ७.४४ | - | -- |
| ७ | छपाई व स्टेशनरी, जाहीरात | ०.७५ | ०.७५ | ०० | ०.८५ | नोकरभरती फी जमा | - | २३.६६ | - | २४.०० |
| ८ | प्रशिक्षण | २.०० | ६.२८ | +४.२८ | ७.०० | | | | | |
| ९ | सादीलवार बँक चार्जेस, लॉकर रेंट इ. | ०.७५ | १.२५ | +०.५० | १.५० | | | | | |
| १० | फेडरेशन वार्षिक वर्गणी | ०.०५ | ०.०३ | -०.०२ | ०.०५ | | | | | |
| ११ | इन्कम टॅक्स रिटर्न चार्जेस खर्च | - | ०.०३ | - | ०.०५ | | | | | |
| १२ | GST, TDS चार्जेस खर्च | - | ०.२४ | - | ०.३० | | | | | |
| १३ | नोकरभरती खर्च | - | ९.८२ | - | ११.०० | | | | | |
| १४ | निवडणूक खर्च | - | ०.५० | - | - | | | | | |
| १५ | इन्कम टॅक्स | ८.५० | - | - | - | | | | | |
| १६ | निव्वळ नफा | २३.५५ | ४१.८५ | - | ४३.८५ | | | | | |
| | **एकूण खर्च** | **५४.५०** | **७८.७९** | **--** | **८६.५०** | **एकूण उत्पन्न** | **५४.५०** | **७८.७९** | **--** | **८६.५० ** |

**सही×××**
**सौ. शुभांगी ज्ञा. ढवळे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सही×××**
**डॉ. श्री. अशोक दा. सुरवसे**
संचालक

**सही×××**
**श्री. प्रकाश सं. वाले**
संचालक

**सही×××**
**श्री. अशोक द. लुणावत**
अध्यक्ष



दि. २६-०८-२०२३ शनिवार रोजी बँक्स असोसिएशनच्या प्रशिक्षण उद्घाटन प्रसंगी डावीकडून संचालक सर्वश्री. दिपक मुनोत, राजगोपाल मिणीयार, रोजगोपाल झंवर, अध्यक्ष श्री. प्रकाश वाले, मा. श्री. किरण गायकवाड (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर), माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत, संचालक श्री. दिनकर देशमुख, सीईओ सौ. शुभांगी ढवळे इ.



दि. २५-०७-२४ रोजी मा.श्री. आबासाहेब गावडे (अध्यासी अधिकारी) यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष श्री. प्रकाश वाले, नूतन उपाध्यक्ष डॉ. श्री. अशोक सुरवसे यांचा सत्कार करताना व संचालक सर्वश्री. राजगोपाल झंवर, राजगोपाल मिणीयार, किसन माळी, अशोक लुणावत, दिपक मुनोत, शंकर पाटील, दिनकर देशमुख व सीईओ सौ. शुभांगी ढवळे.



दि. ३०/०४/२०२३ रोजी प्रशिक्षण कार्यक्रमात वक्ते श्री. प्रमोद मेहता (रिटायर्ड जन. मॅनेजर), सारस्वत बँक व सीईओ जनसेवा सह. बँक, पुणे यांचा सत्कार करताना असोसिएशनचे माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत, उपाध्यक्ष डॉ. श्री. अशोक सुरवसे, संचालक श्री. दिपक मुनोत, बँकिंग प्रगती त्रैमासिकाचे संपादक श्री. राजेंद्र कोठावळे



दि. ३०/०४/२३ रोजी प्रशिक्षण कार्यक्रमात माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत यांच्या हस्ते वक्ते श्री. सुनिल हिरेमठ (विशेष वसुली अधिकारी, पंढरपूर मर्चंटस् बँक, पंढरपूर) यांचा सत्कार करताना व संचालक श्री. दिपक मुनोत, श्री. दिनकर देशमुख, श्री. राजेंद्र कोठावळे.



दि. २३/२/२०२४ ते २५/२/२०२४ महाबळेश्वर येथे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करताना संचालक श्री. कल्याणराव काळे, श्री. दिपक मुनोत, माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत, अध्यक्ष श्री. प्रकाश वाले, संचालक श्री. किसन माळी, श्री. शंकर पाटील



दि. २४/०२/२०२४ रोजी महाबळेश्वर येथे प्रशिक्षण कार्यक्रमात वक्ते सी.ए. श्री. दिलीप गुरव (सीईओ दि कराड अर्बन को.ऑप. बँक लि., कराड) यांचा सत्कार करताना असोसिएशनचे अध्यक्ष श्री. प्रकाश वाले, माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत व कराड अर्बन बँकेचे अधिकारी.



दि. २४-०२-२०२४ रोजी महाबळेश्वर येथे प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थित डावीकडून असोसिएशनचे संचालक श्री. किसन माळी, माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत, अध्यक्ष श्री. प्रकाश वाले व महाराष्ट्र राज्य असोसिएशन व नाशिक जिल्हा बँक्स् असो. चे अध्यक्ष श्री. विश्वास ठाकुर, असो. चे सीईओ सौ. शुभांगी ढवळे व कर्मचारी अमोल चिन्नी, सुरज कांबळे, किरण साळुंके



दि. २५-०२-२४ रोजी महाबळेश्वर येथे प्रशिक्षण कार्यक्रमात वक्ते सी.ए. श्री. गिरीष चैसास (अध्यक्ष, अहमदनगर जि. बँक्स् असो.) यांचा सत्कार करताना असो. चे माजी अध्यक्ष श्री. अशोक लुणावत, संचालक श्री. किसन माळी, श्री. दिपक मुनोत, श्री. शंकर पाटील.



दि. २३-०२-२४ ते २५-०२-२४ रोजी महाबळेश्वर येथे प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थित असलेले सोलापूर जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ.



दि. ०२-०६-२४ रोजी प्रशिक्षण कार्यक्रमावेळी दिपप्रज्वलन करताना सी.ए. श्री. एस.बी. पांढरे, असो. चे उपाध्यक्ष डॉ. श्री. अशोक सुरवसे, संचालक श्री. दिपक मुनोत, श्री. शंकर पाटील, श्री. दिनकर देशमुख, श्री. राजेंद्र कोठावळे व सीईओ सौ. शुभांगी ढवळे.

प्रति, ______________________

______________________

______________________


❊ प्रेषक मा. चेअरमन ❊

Book - Post

**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी**
**बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.**

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया
(ट्रेझरी शाखेजवळ), सोलापूर - ४१३००१ ✆: (०२१७) २७२४४३२

Email : surbanksassoaciation@gmail.com
Reg. No. SUR / DDR / GNL / 1082 /1983 Dt. 27 / 07 /1983